२) बँक व्यवसायाच्या अशा करारामध्ये संबधीत आहेत व भाग घेतला आहे ज्यामध्ये त्यास फायदा होत असेल तर.

३) नैतिक अध:पतनाच्या बाबींमध्ये दोषी ठरविण्यात आले असेल तर.

४) बँकेतील कोणत्याही फायदा होणाऱ्या पदावर असेल तर. तथापि राज्य सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा पूर्ण वेळ कर्मचारी किंवा सेवक प्रतिनिधी जरी पूर्ण वेळ पगार घेणारा सदस्य असला तरी अशा पदांकरीता पात्र ठरेल.

५) सहकारी कायद्यातील कलम ७३(अ) नुसार संचालक मंडळाचा कोणीही पदाधिकारी एकापेक्षा अधिक सहकारी बँका अथवा पतसंस्थावरील संचालक मंडळावर अध्यक्ष/उपाध्यक्ष पदावर राहू शकणार नाही.

६) त्यांचा व त्यांच्या कुंटूबियांचा निबंधकांच्या पूर्व परवानगीशिवाय बँकेने भाडेतत्वावर किंवा मालकी हक्काने घेतलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत हितसंबध असल्यास.

७) कोणत्याही डिक्री अथवा रिकव्हरी सर्टिफिकेटनुसार त्यांचेकडून बँकेस कोणतीही रक्कम येणे असल्यास.

८) बँकेमार्फत अथवा बँकेविरुध्द काम करणाऱ्या कायदेशीर सल्लागाराकडे नोकरीत असल्यास अथवा त्यांचेशी संबधीत असल्यास.

**(खुलासा – कायदेशीर सल्लागार म्हणजे ॲडव्होकेटस् ॲक्ट १९६१ च्या कलम २ उपकलम १ मधील क्लॉज १ नुसार असणारी कायदेशीर सल्लागाराची व्याख्या.)**

९) कायद्यानुसार कोणत्याही गुन्ह्यामध्ये दोषी ठरविला गेला असल्यास.

१०) कायद्यानुसार सभासद म्हणून अपात्र ठरल्यास.

११) कायद्यानुसार त्याचे सभासदत्व निष्कासीत झाले असल्यास.

१२) सततच्या तीन संचालक मंडळ सभांना तो अनुपस्थित असल्यास व त्याची अनुपस्थितीस संचालक मंडळाने सूट दिलेली नसल्यास.

१३) सततच्या दोन वार्षिक सर्वसाधारण सभांना तो अनुपस्थित असल्यास आणि त्याची अनुपस्थितीस संबधीत वार्षिक सभेतील सभासदांनी सूट दिलेली नसल्यास.

## ४६) संचालक मंडळ सभांसाठी गणपूर्ती :

संचालक मंडळ सदस्य संख्येच्या १/२ किंवा त्यापेक्षा जास्त संचालक उपस्थित असतील तर गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. सदर संख्या अपूर्णांकात आली तर त्यापुढील पूर्ण संख्येस गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. संचालक मंडळ सभेच्या गणपूर्तीसाठी कार्यलक्षी संचालकांना मोजण्यात येणार नाही. पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीं व्यतिरिक्तच्या सभांमध्ये स्वीकृत तज्ञ संचालकांचा समावेश गणपूर्तीत केला जाईल.